*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

# UNIT 4
# C. S.PEIRCE
# सी. एस. पीअर्स

1 फलवाद
2 अर्थाचा सिध्दान्त
3 अन्वेषण पध्दती



**CHARLES SANDERS PEIRCE**
*(September 10, 1839 - April 19, 1914)*
*American philosopher, logician, mathematician, educated as a chemist and employed as a scientist for 30 years. Today he is appreciated largely for his contributions to logic, mathematics, philosophy, scientific methodology, and semiotics, and for his founding of pragmatism.*



**प्रस्तावना** : सी.एस.पिअर्स या अमेरिकन तत्वज्ञाचा जन्म 1839 साली केंब्रिज (अमेरिकेतील) येथे झाला. त्याला बालपणापासून शास्त्रज्ञ होण्याची मनीषा होती व गणित आणि विज्ञान या विषयांत त्याला विशेष गोडी व गती होती. त्याचे वडील बेंजामिन पिअर्स हे प्रसिद्ध गणिततज्ज्ञ होते. त्याने 1863 साली रसायनशास्त्रांमध्ये हार्वर्ड विद्यापीठाची पदवी प्राप्त केली. परंतु तरुणपणाचा बराच काळ त्याला अमेरिकेच्या कोस्ट सर्व्हे मध्ये नोकरी करावी लागली. मनात इच्छा असूनही त्याला शैक्षणिक क्षेत्रात पाय रोवता आले नाहीत व स्वत: केलेले लेखनही प्रसिद्ध करता आले नाही. 1872 ते 1884 या कालावधीत पिअर्सला हॉपकिन्स विद्यापीठामध्ये तर्कशास्त्राचा अध्यापक म्हणून नोकरी मिळाली व 1887 मध्ये तो सेवानिवृत्त झाला. Charles Santiago Sanders Peirce हे त्याचे संपूर्ण नाव होते.

पिअर्सचा फलवाद पाहण्यापूर्वी आपण थोडक्यात ‘फलवाद’ या विचारसरणीची माहिती घेवू. विसाव्या शतकात जी जागतिक उलथापालथ झाली आणि अमेरिका ही महासत्ता म्हणून प्रस्थापि झाली, त्यामागे फलवादाची खूप मोठी बूमिका आहे. फलवादाला विसाव्या शतकात जास्त काटेकोर व अतिव्यवहारवादी अर्थ आला, त्याचा तात्त्विक गाभा हरविला, तो जवळपास विकृत झाला. त्याचा लोकशाही जीवनशैलीवरही परिणाम झाला. त्याचेच परिणाम सारे जग भोगीत आहे. हा वाद या कारणामुळेच आज महत्वाचा ठरतो.

## फलवादाची पार्श्वभूमि

इंग्लीशमधील *pragmatism* या शब्दाचे भाषांतर म्हणून ‘फलवाद’,‘फलत:प्रामाण्यवाद’ हे शब्द वापरण्यात येतात. *pragmatism* हा शब्द ग्रीक भाषेतील *pragma* (म्हणजे ’कृती’) आणि *prassō* (म्हणजे इतरांना देणे, व्यवहारात आणणे, मिळविणे) पासून बनतो. साहजिकच म्हणजे व्यवहारी लाभ करून देणारा विचार असा *pragmatism* चा अर्थ होतो.

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

‘फलवाद’,‘फलत:प्रामाण्यवाद’ ही तत्त्वज्ञानातील जुनी परंपरा आहे.तथापि या सिध्दान्ताची सुव्यवस्थित मांडणी 19व्या शतकात 1870 साली अमेरिकेत झाली.‘व्यवहार आणि सिध्दांत’ यांच्यात सांगड घालणे, हा फलवादाचा केंद्रबिंदू आहे.सिध्दांत व्यवहारापासून कसा तयार होतो आणि पुन्हा तो व्यवहाराकडे कसा प्रवास करतो की ज्यामुळे तो व्यवहार ‘सुज्ञ व्यवहार’ ठरतो, यावर हा सिध्दांत आधारलेला आहे.उपकरणवाद(instrumentalism),मौलिक अनुभववाद (radical empiricism),परीक्षणक्षमतावाद (verificationism), संकल्पनात्मक सापेक्षता (conceptual relativity),बाधिततावाद (fallibilism) ही त्याची रूपे आहेत.[1]



## पीअर्सने केलेले फलवादाचे प्रकार

पीअर्सने त्याचा फलवाद मुख्यत: दोन प्रकारे मांडला.1) आधीचा फलवाद 2)नंतरचा फलवाद. याचा अर्थ असा की त्याने मांडला तो ‘अभिजात फलवाद’. हा मूळ फलवाद होता. यास त्याने **PRAGAMATISM** प्रॅग्मॅटिझम असे नाव दिले. नंतर त्याच्या फलवादाचा प्रभाव पडून इतर तत्त्वज्ञांनी फलवाद मांडला, पण तो मूळ फलवादापासून दूर गेला. त्यांनी आपल्या सिध्दांतास **PRAGAMATISM** असेच नाव दिले. पण त्यामुळे पीअर्सचा फलवाद व या तत्त्वज्ञांचा फलवाद यात फरक उरला नाही. त्यामुळे पीअर्सने पुन्हा एकदा स्वत:च्या फलवादाची मांडणी केली. हा ‘नंतरचा फलवाद’ होय. या भूमिकेस त्याने *Pragmaticism* प्रॅग्मॅटिसीझम (*Pragmatism* प्रॅग्मॅटिझम नव्हे.) या दरम्यान अनेक प्रकारचे फलावाद मांडले गेले.ते असे :

फलवादाचे अभिजात,आधुनिक आणि नवफलवाद, नवअभिजात फलवाद असे प्रकार करता येतील.[2]

### अ) अभिजात फलवाद [3]

अभिजात फलवाद अमेरिकेतील **The Metaphysical Club** या क्लबचे सदस्य सी. एस.पिअर्स,विल्यम जेम्स, चॉनसी राईट [4], जॉन ड्युई [5](1859-1952) आणि जॉर्ज हर्बर्ट मीड [6] यांनी प्रथम मांडला. हा मूळ फलवाद असल्याने या विचारसरणीस ‘अभिजात फलवाद’ म्हणतात.

### ब)आधुनिक फलवाद [7]

आधुनिक फलवाद विसाव्या शतकात क्वाईन [8], सेलर [9] यांनी मांडला.तार्किक प्रत्यक्षवादाची मांडणी करताना त्यांनी फलवादाची 1960 मध्ये पुनर्मांडणी केली.

### क) नवफलवाद [10]

---

[1] http://en.wikipedia.org/wiki/Pragmatism
[2] http://en.wikipedia.org/wiki/Pragmatism
[3] http://plato.stanford.edu/entries/pragmatism/
[4] **Chauncey Wright** (September 10, 1830 - September 12, 1875), American philosopher and mathematician
[5] **John Dewey** (October 20, 1859 – June 1, 1952) was an American philosopher, psychologist and educational reformer whose ideas have been influential in education and social reform. Dewey was an important early developer of the philosophy of pragmatism and one of the founders of functional psychology. He was a major representative of progressive education and liberalism .Although Dewey is known best for his publications concerning education, he also wrote about many other topics, including experience, nature, art, logic, inquiry, democracy, and ethics.
[6] **George Herbert Mead** (1863–1931) was an American philosopher, sociologist and psychologist, primarily affiliated with the University of Chicago, where he was one of several distinguished pragmatists. He is regarded as one of the founders of social psychology and the American sociological tradition in general.
[7] http://en.wikipedia.org/wiki/Pragmatism
[8] **Willard Van Orman Quine** (June 25, 1908 – December 25, 2000) (known to intimates as "Van") was an American philosopher and logician in the analytic tradition.
[9] **Wilfrid Stalker Sellars** (May 20, 1912 – July 2, 1989) was an American philosopher
[10] http://plato.stanford.edu/entries/pragmatism/

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

या फलवादाची मांडणी रिचर्ड रॉटी[11] यांनी प्रथम केली. नंतर ती हिलरी पुटनाम [12] आणि रॉबर्ट ब्रण्डन [13] यांनी विकसित केली.

**ड) नवअभिजात फलवाद [14]**

या फलवादाची मांडणी सुसान हॅक [15] या विदुषीने केली.

## 1. पिअर्सचा फलवाद (अभिजात फलवाद)



पिअर्सने स्वत:च्या तत्वज्ञानाची सुव्यवस्थित मांडणी केली नाही. मात्र त्याच्या विचारांवर जगातील विविधता, उत्स्फूर्तता आणि नावीन्य यांची विशेष छाप होती. डार्विनच्या जीवनशास्त्रीय सिद्वांतामध्ये फलवादाची बीजे असल्याचे त्यास जाणवल्याने या सिध्दांताचा त्याच्या मनावर खोल परिणाम झाला होता. वास्तववादी आणि प्रयोगवादी दृष्टिकोन स्वीकारुन पिअर्सने अर्थविषयक फलवादी उपपत्ती मांडली. पिर्असच्या हयातीत त्याचे फारसे लेखन प्रसिद्ध झाले नाही. प्रथम 1923 साली *Chance, Love and Logic: Philosophical Essays*, (ed.by Morris Raphael Cohen) हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यानंतर पिअर्सने लिहीलेले लेख आठ खंडात *Collected Papers of Charles Sanders Peirce* या नावाने प्रसिद्ध करण्यात आले. ही बरीच पुस्तके त्याने लिहिली.

त्यांच्या लेखनातील विचार अभिजात आणि मौलिक स्वरुपाचे आहेत. आकारिक तर्कशास्त्र आणि अर्थ आणि अभिप्रायविषयक प्रश्नांचे त्याने केलेले विवरण आधुनिक सेमॅन्टिक्समध्येही अंत्यत महत्वपूर्ण मानले जाते. गणितशास्त्र, निसर्गशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र आणि तर्कशास्त्र या सर्व शास्त्रांच्या मदतीने एक व्यापक वैश्विक सुव्यवस्थित अशी तत्वप्रणाली घडविली पाहिजे. असे त्याला तीव्रपणे वाटत असे. जगातील परिस्थिती सतत बदलत असते. विकसित होत असते या विकासप्रक्रियत कोणत्याही कल्पनेचे व कृतीचे परिणाम काय घडून येतात, त्याचे निरीक्षण करावे हेच फलवादाचे एक लक्षण आहे. कृतीच्या आधारावर मूर्त परिस्थीत कोणत्याही कल्पनेचा अर्थ कळू शकतो असे पिअर्सने आग्रहाने सांगितले. स्वत:च्या या विचारसरणीला त्याने फलवाद किंवा फलप्रामाण्य (PRAGAMATISM) वाद हे नाव दिले.

"How To Make Our Ideas Clear" (1878) या शोधनिबंधात त्याने प्रथम फलवादाची मांडणी केली. `Popular Science Monthly' या नियतकालिकात हा निबंध प्रसिध्द झाला. PRAGAMATISM प्रॅग्मॅटिझम हा शब्द पिअर्सने प्रथम वापरला.'व्यवहार' असा ज्याचा अर्थ होतो,अशा ग्रीक धातूपासून तो उत्पन्न होतो. पिअर्सने तो कांटचा *Critique Of Pure Reason* हा ग्रंथ वाचताना त्याला तो सुचला.[16] तो पिअर्सने आपल्या विवेचनासाठी वापरला.

## 2.अर्थाचा सिध्दांत : (अर्थप्रतिपादन आणि अर्थविवरण पध्दती)

*कोणतीही कल्पना प्रत्यक्ष वापरुन व कामाला जुंपून तिचे परिणाम काय होतात त्यांचे परीक्षण करावयाचे,* हा फलवादाचा मुख्य उददेश आहे. त्यामुळे पिअर्सच्या मते,फलवाद ही स्वतंत्र सदस्तुमीमांसा किंवा तत्वज्ञान नसून तात्विक समस्या

---

[11] **Richard McKay Rorty** (October 4, 1931 – June 8, 2007) was an American philosopher.

[12] **Hilary Whitehall Putnam** (born July 31, 1926) is an American philosopher, mathematician and computer scientist, who has been a central figure in analytic philosophy since the 1960

[13] **Robert Brandom** (born 1950) is an American philosopher who teaches at the University of Pittsburgh. He works primarily in philosophy of language, philosophy of mind and philosophical logic, and his work manifests both systematic and historical interests in these topics. He earned his B.A. from Yale University and his Ph.D. from Princeton University, under Richard Rorty and David Kellogg Lewis

[14] http://en.wikipedia.org/wiki/Pragmatism

[15] **Susan Haack** (born 1945, England) is an English professor of philosophy and law at the University of Miami in the United States

[16] मानवी हेतूंशी संबंध असणाऱ्या व कलेशी निगडीत असणा-या नियमांच्या गटाला काटंने PRAGAMATIC प्रॅग्मॅटिक असा शब्द योजला होता.

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

सोडविण्याचे तंत्र किंवा साधन आहे. म्हणजेच, फलवाद ही एक अर्थाचे स्पष्टीकरण करणारी पद्वती आहे. व्यवहारात ***'ज्या संकल्पनाचे सामान्यीकरण करता येते व ज्या परीक्षणक्षम असतात, केवळ त्याच संकल्पना सत्य असतात'*** असे पिअर्सचे म्हणणे आहे.

येथे 'व्यवहार' हा शब्द, 'अनेक शास्त्रंज्ञानी वेळोवेळी केलेले प्रयोग व त्यावरुन सर्वमान्य झालेली सामान्य तत्वे आणि त्यांचा परस्परांच्या संबंधात केलेला वापर', अशा सामूहिक अर्थाने त्याने वापरले.पिअर्सच्या मते फलवाद ही तत्वप्रणाली नसून संशोधन पद्वती आहे.म्हणजेच 'संकल्पनांचा अर्थ निश्चित करण्याची एक पध्दती' आहे, असे त्याचे म्हणणे आहे. व्यवहारिक बाजू असू शकेल, असे कोणते परिणाम आपल्या संकल्पनांच्या विषयापासून निष्पन्न होवू शकतील, याचा विचार यात अपेक्षित आहे. माणसाने या पध्दतीने विचार करावा. मग या परिणांमाविषयीचे आपले संकल्पन तेच त्या विषयासंबंधीचे आपले संपूर्ण संकल्पन हा. या पध्दतीचा मानसशास्त्रीय आधार म्हणून व व्यवहार उपयोगी निकष म्हणून वापर केला पाहिजे. पिअर्सने फलवादाचे स्पष्टीकरण करण्यासाठी काही आकर्षक उदाहरणे दिली आहेत. समजा एखाद्याने मला असे सांगितले आहे की 'हा विशिष्ट पदार्थ कठीण आहे' परंतु कठीण या शब्दांचा अर्थ मला माहित नसेल तर विधानाचा अर्थ मला समजणार नाही त्यानंतर सांगणाऱ्याने 'कठीण' या शब्दाचा अर्थ ''थोड्याशा दाबाने लोण्याचा गोळा जसा मोडतो तसा तो मोडत नाही'' असे स्पष्टीकरण केले, असे समजू. आता,त्याने सांगितलेला अर्थ या पदार्थाला लागू पडतो काय हे पाहण्यासाठी मी या विशिष्ट पदार्थावर दाब दिला व तो मोडत नाही, हे तपासून पाहिले - म्हणजे 'प्रत्यक्ष परिक्षण' करुन त्याचे विधान खोटे नाही, असे दिसून आले.म्हणून '' 'हा विशिष्ट पदार्थ कठीण आहे', हे विधान सत्य म्हणून'' मी मान्य केले. आता या उदाहरणात जर मी 'प्रत्यक्ष परिक्षण' व विधानाचा त्याच्याशी असलेला संबंध मान्य केले नाहीत तर कठीण आणि मऊ इत्यादी शब्दांतील भेदच स्पष्ट होऊ शकणार नाही.परिणामी अनुभवाशी जुळणारे अर्थपूर्ण शब्द वापरणे अशक्य होईल.ते मान्य केल्यावरच त्या विधानाचे सत्यत्व त्यांच्यापासून होणाऱ्या परिणामावरुन सिद्व करता येते, असे होईल. म्हणजे विधानाचे प्रत्यक्ष फल मिळाले तरच ते विधान फलदायी असते.म्हणजे 'व्यवहार्य'(pragmatic) ठरते. हा फलवाद होय. अशा त-हेने फलवादी पद्वती फार उपयुक्त ठरते.

या संदर्भात पिअर्सने 'परिक्षण' आणि 'सत्य' या संकल्पनांमधील सूक्ष्म भेदही स्पष्ट केला आहे. 'या पदार्थाला वजन आहे', या विधानाचे सत्य पडताळून पाहण्यासाठी मी असे स्पष्टीकरण केले की जर विरोध करणारी शक्ती उपस्थित नसेल तर हा पदार्थ खाली पडेल. येथे पहिल्या विधानाचे परिक्षण करता येते व त्यावरुन विधान सत्य आहे असे दाखविता येते.

मात्र त्याचे सत्यत्व त्या सोपाधिक परिक्षणावरुन अवंलबून नाही. ते विधान स्वतंत्रपणे सत्य आहे व परीक्षण केले नाही तरी सत्य राहील. परीक्षण हा सत्याचा 'निकष' आहे. सत्याचा 'अर्थ' नव्हे. अशा प्रकारे, सत्य हे परीक्षणापेक्षा भिन्न आहे व परीक्षणाचा संबंध प्रत्यक्ष कृती व परिणाम इत्यादीशी असतो हे पिअर्सने दाखवून दिले.

पिअर्सने फलवादी पद्वतीमध्ये उपयुक्तेइतकेच महत्व अर्थप्रतिपादन आणि अर्थविवरण यांना दिले. फलवादी पद्वती वापरल्यास आपल्याला संकल्पनांचे अधिक चांगले स्पष्टीकरण मिळू शकते असा त्याचा दावा आहे.

थोडक्यात, व्यावहारिक उपयुक्तता,अर्थाचे प्रतिपादन व अर्थाचे स्पष्टीकरण हे तीन घटक पिअर्सच्या फलवादात आहेत.

तथापि,जेम्स व ड्युई आणि शिलर यांच्याकडून तो फारच लोकप्रिय केला गेला, त्याचे स्वरूपही बदलले.प्रारंभी केवळ अर्थासंबंधी असणारी ही विचारसरणी नंत नीति व धर्म या क्षेत्रात वापरली गेली. विसाव्या शतकात तर तिला खूप क्रूर स्वरूप आले.त्यामुळे जेम्स आणि सीलर या फलवादाच्या प्रसिद्व पुरस्कर्त्यांच्या विचारापासून स्वत:चा फलवाद भिन्न आहे हे दाखविण्यासाठी पिअर्सने 1905 साली स्वत:च्या सिद्वांताला *Pragmaticism* प्रॅग्मॅटिसीझम (*Pragmatism* प्रॅग्मॅटिझम नव्हे.) हे नाव दिले.या नावबदलाबद्दल तो म्हणतो,''अपहरणकर्त्यांपासून न वाचविल्यास आणखी ओंगळ होईल''("ugly enough to be safe from kidnappers" (*Collected Papers* (CP) 5.414) असे तो म्हणतो[17].

[17] http://en.wikipedia.org/wiki/Pragmaticism

4

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## 1. अर्थ आणि कृती :-

कोणत्याही वैचारिक संकल्पनेचा अर्थ आणि प्रत्यक्षातील वर्तन यांचा घनिष्ठ संबंध असतो, हे पिअर्सने पुन्हापुन्हा स्पष्ट केले आहे. कारण ज्या सापेक्ष विधांनाच्या साहाय्याने पदांचे व संकल्पनाचे अर्थ स्पष्ट केले जातात त्यांचा वर्तनाशी, संबंध असतो. अर्थात याचा अर्थ असा नव्हे. की वैचारिक पातळीवर एखादी संकल्पना समजून घेण्यासाठी माणसाला विशिष्ट कृती करावी लागते. उदा. कठीण या शब्दाचा अर्थ समजावून सांगताना ऐकणा-याच्या मनात मी कल्पनेच्या साहाय्याने त्याला कोणत्या कृतीमुळे कठीणपणा पारखून घेता येऊ शकेल. याचे वर्णन करुन अर्थ पटवून देऊ शकेल यासाठी कठीण पदार्थावर प्रत्यक्ष दाब देण्याची क्रिया त्याने केलीच पाहिजे, असे मुळीच नाही. मनाने विचारांच्या पातळीवर संकल्पनाचा अर्थ समजून घेता येतो. मात्र त्यांचे स्पष्टीकरण व क्रिया यांचा अतुट संबंध असतो.

किंबहुना पिअर्सच्या मते आपल्या मनात कशाचीतरी कल्पना आहे असे म्हणणे म्हणजे त्या कल्पनेमुळे अमुक अमुक विशिष्ट इंद्रियगोचर परिणाम होतील याविषयीची कल्पना असणेच होय.

## 2. स्खलनीयता सिद्धांत :-

माणसाला संपूर्ण सत्य ज्ञान प्राप्त व्हावे असे वाटत असते परंतु मानवाला होणा-या ज्ञानामध्ये परमनिश्चिती व परमवैश्विकता कधीही प्राप्त होऊ शकत नाही असे पिअर्सने आग्रहाने प्रतिपादन केले. पिअर्सच्या मते माणसाला निरपवाद व निरुपाधिक अशा सत्याचा लाभ कधीही होऊ शकत नाही. मानवाचे ज्ञान स्खलनीय असते. त्यांत संभाव्यतेच्या कमी अधिक पातळ्या व अंश असतात. वैज्ञानिक क्षेत्रातील सिद्धांत व निकषणे देखील कालातरांने अपूर्ण व चूकीची आहेत असे आढळून येते. पिअर्सच्या या सिद्धांताला *स्खलनीयता सिद्धांत* असे म्हणतात. अर्थात मानवी ज्ञानातील अपुरेपणा ध्यानात ठेऊ नये. प्रत्यक्ष व्यवहारात व वैज्ञानिक संशोधनात सर्वांना समान असणारे व्यक्तीनिरपेक्ष सत्य हेच ध्येय मानावे लागते. व वस्तुनिष्ठ रीतीने नवेनवे शोध लावावे लागतात हे पिअर्सलाही मान्य आहे. किंबहुना संशयासाठी संशय घेत राहणे हे अतिरेकीपणाचे व धोक्याचे असते असे त्याचे मत आहे. या कारणामुळेच पिअर्सला देकार्तची संशयपद्धती ग्रह्य वाटली नाही.

## 3. संशयपद्धतीचा निषेध (देकार्तवरील टीका)

सत्य शोधनाच्या प्रक्रियेमध्ये देकार्तने संशयपद्धतीचा वापर केला, याबददल पिअर्सने कडक निषेध दर्शाविला संशयाचे तंत्र वापरुन प्रत्येक गोष्टीचे परिक्षण करीत करीत जे नि:संदिग्ध व संशयातील असेल त्याचा स्वीकार करावयाचा हे देकार्तच्या संशयपद्धतीचे स्वरुप आहे. परंतु पिअर्सच्या मते कोणत्याही गोष्टीबददल संशय घेणे आपल्या लहरीवर अवलंबून नसते. शिवाय खरा संशय निर्माण होण्यासाठी आपल्या अनुभवामध्ये कुठेतरी संघर्ष किंवा विसंवाद निर्माण व्हावा लागतो. आपल्या बाह्य किंवा आंतरिक अनुभवाशी व विश्वासाशी विसंगत अशी घटना घडावी लागते. त्यामुळे आपण शोध आणि अन्वेषण करु लागतो.सत्याचा शोध घेतो.

सारांश, संशय हा शोध किंवा अन्वेषण करण्यास उद्युक्त करणारा प्रेरक आहे. परंतु वैश्विक सिंदधांत म्हणून संशयाचा उपयोग करणे विफल ठरते. कारण त्यात खरा संशय व्यक्त होत नसून तथाकथित किंवा कृत्रिम संशय व्यक्त केला जातो. पिअर्सच्या मते कार्तेशियनवाद हा शास्त्रीय आणि वैश्विक संशयावर आधारलेला नसून व्याज संशयावर आधारलेला आहे. देकार्तचा संशय हा पद्धतीनिष्ठ संशय आहे. तो खरा नाही. जर संशय घेण्यासाठी पुरेसे कारण असेल तरच संशय योग्य असतो परंतु तसे कारण नसेल तर, संशय कृत्रिम ठरतो. देकार्तने दुस-या प्रकारच्या संशयाचा आश्रय केला आहे व त्यामुळे त्याची संशयपद्धती स्वीकार्य नाही.

## 4. पिर्असचा संशय-श्रद्धा सिद्धान्त :- (पीअर्सची शोध ही कल्पना)

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



पिर्असने मानवी मनोव्यापारांचे व वर्तनाचे विश्लेषण करण्यासाठी संशय-श्रद्धा सिद्वांन्त उपयोगात आणला. त्यांच्या मते जीवन जगण्यासाठी सामान्यत: कोणत्याही प्राण्याला आणि विशेषत: माणसाला निरनिराळया सवयी जडून घ्याव्या लागतात. सवयी दृढमूल झाल्या की, त्यांच्या श्रद्वा बनतात. पिअर्सने या प्रक्रियेला शोध प्रक्रिया असे म्हटले आहे.

अन्वेषणाचा आरंभ संशयाने होतो. परंतु संशयाची स्थिती तापदायक आणि अस्वस्थता निर्माण करणारी असते. तिच्यातून सुटका होण्यासाठी श्रद्वेची सुखद स्थिती प्राप्त करुन घेणे आवशयक असते. श्रद्वा याचा अर्थ सेंद्रियस्थिरता आणि बौद्विक समाधान या दोन्हीचा मिलाफ होय. आपल्या श्रद्वा म्हणजे आपल्या वर्तनाचे नियम असतात. कोणत्याही विचारकृतीमध्ये उतरविण्यासाठी आपल्या श्रद्वांचा जोरदार पाठिंबा असावा लागतो. विचारांविचारांमधील फरक हा कृतीमधील फरकांमध्ये प्रतिबिंबित होतो आणि त्यामागे विविध श्रद्वांची प्रेरणा असतो. ज्या श्रद्वांचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे कृती व परिणामांच्या दवारा परिक्षण करता येते अशा श्रद्वा स्वीकार्य असतात. अशा प्रकारे त्रासदायक संशयापासून आंरभ होऊन श्रद्वेचा सुखद अवस्थेपर्यत जाणे हा शोधाचा शेवट असतो. याच प्रक्रियेला संशय-श्रद्वा सिंद्वात म्हणतात. याच्या साहाय्याने श्रद्वा अधिकाधिक स्थिर होत जातात. व त्यांच्यामुळे मानवी कृतीला योग्य वळण मिळत जाते.

## 3. पिअर्सची अन्वेषण पध्दती (ज्ञानमीमांसा)

ज्ञानाचा आरंभ संवेदनापासून होतो. शोध प्रक्रियेचा अंतिम उद्‌देश म्हणजे ज्ञान संपादन करणे. ज्ञानमीमांसा ही गोष्ट बऱ्याचा प्रमाणात सद्वस्तुमीमांसा, मानसघटनाशास्त्र आणि तर्कशास्त्र यांच्यावर अवलंबून असते, असे पिअर्सला ठामपणे वाटते. तत्वज्ञानाचे सर्व प्रश्न तार्किक सिद्वातांवर आधारलेले असले पाहिजे. ज्ञानमीमांसा हा तत्वज्ञानाचा अविभाज्य घटक असल्याने त्यात तर्कशास्त्र पद्वतीचा उपयोग केला पाहिजे व अनुमानांचे वर्गीकरण करुन युक्त अनुमान प्रक्रियांचे स्वरुप समजावून घेतले पाहिजे माणसाला मिळालेले ज्ञान अपुर्ण असते त्यात भरपूर चुका व त्रुटी असतात. तर्कशास्त्राच्या साहाय्याने मानवी ज्ञानातील दोष नाहीसे करता येतील. सत्य विधानांचा शोध लावता येईल असा त्याला विशवास होता.

### [अ] चिन्ह शास्त्र व अर्थनिष्ठ उपपत्ती :-

ज्ञानमीमांसेमध्ये चिन्हशास्त्राला अत्यंत महत्वाचे स्थान आहे असे पिअर्सचे मत होते. 'चिन्ह' या पदाची व्याख्या 'जे स्वत:व्यतिरीक्त कोणत्याही स्वतंत्र वस्तुचा निर्देष करते ते', ही पिअर्सला मान्य होती. त्याच्या मतानुसार 'कोणतेही चिन्ह तीन रुपांमध्ये लिहिता येते.

1. प्रत्यक्ष चिन्ह
2. ज्या वस्तुचा निर्देश त्या चिन्हामुळे केला जातो ती वस्तु.
3. चिन्हाचा अभिप्रेत अर्थ

हे तीन पैलू स्पष्ट करण्यासाठी पिअर्सने त्रिकोण हे भूमितीतील पद उदाहरणादाखल घेतले आहे. 'त्रिकोण' हा बोललेला किंवा लिहीलेला शब्द म्हणजे 'प्रत्यक्ष चिन्ह' होय. त्रिकोणाची आकृती अथवा प्रत्यक्ष त्रिकोण ही 'वस्तु' आणि त्रिकोण म्हणजे त्रिभुजांची समतोल आकृती त्याचा 'अभिप्रेत अर्थ'.

अशा प्रकारे चिन्हाशास्त्राच्या आधाराने पिअर्सने अर्थ आणि अभिप्राय यांविषयीच्या प्रश्नांचे विश्लेषण केलेले दिसले. त्याच्या मते कोणत्याही संकल्पनेची व्याख्या पोकळीत करता येत नाहीत. संकल्पनांना कृतीच्या व संकल्पनेच्या संदर्भातच अर्थ प्राप्त होतो. केवळ तार्किक विशलेषणाने अर्थ निशचित होत नाही. संकल्पनेने प्रत्यक्ष अथवा संभाव्य परिणामावरुनच वस्तुची संमग्र संकल्पना समजू शकते. पिअर्सच्या मते तर्कशास्त्राची मूल तत्वे आणि आकार हे अचल आणि अपरिवर्तनीय दिसत असले तरी त्याच्यांतही विकास उत्क्रांतीं होत असते.

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

7

## आ] तर्कशास्त्राचे स्वरुप :-

पिअर्सने चिन्ह शास्त्रांचा ऊहापोह करीत असतांना तर्कशास्त्राच्या स्वरुपाविषयीही विवेचन केलेले दिसून येते. त्याने तर्कशास्त्राचे तीन भाग पाडले.

1. **स्वैरकल्पनाधारित व्याकरण :-**

या विभागात चिन्ह किंवा प्रतिक आणि त्याच्या अर्थपूर्णतेच्या अटी यांचा परस्परसंबंध कोणत्याही प्रकारचा असतो याविषयी विचार केला जातो. पिअर्सच्या मते प्रत्येक प्रतिकारात्मक किंवा चिन्हात्मक संबंधामध्ये तीन घटक आवश्यक असतात (अ) प्रत्यक्ष चिन्ह (ब) वस्तू (क) अभिप्रेत अर्थ.

2. **समीक्षात्मक तर्कशास्त्र :-**

निकगम व विगमन तर्कशास्त्रातील युक्तीवादाचे सर्व आकारांचा या भागात समावेश होतो. नेहमीच्या विगामी व निगामी युक्तीवादाशिवाय अपवादात्मक युक्तीवादाचा यात अंतर्भाव होतो कोणत्याही निरक्षित घटनांपासून एखादी सिद्वांत कल्पना बांधणे व त्यापासून कोणते निष्कर्ष काढता येतात ते शोधणे व त्याचे परिक्षण करणे या प्रक्रियेला उपपादनात्मक अनुमान म्हणतात. पिअर्सच्या मते तर्कशास्त्र उपपादनात्मक असते.

3. **स्वैरकल्पनाधारित भाषालंकार शास्त्र :-**

या विभागातील तर्कशास्त्राचा संबंध अर्थापत्तीशी असतो पिअर्सच्या मतानुसार प्रतिकांचे नेमके अर्थ कोणते होतात त्यांच्या विषयी अर्थदर्शी व्याख्या व वस्तू कोणत्या व हे ठरीविण्यासाठी अर्थ निशिचतीची पदधती व नियम कोणते इत्यादी समस्या सोडविण्याचा प्रयत्न यामध्ये केला जातो. त्यासाठी भाषालंकारशास्त्राची मदत अपरिहार्यपणे ध्यावी लागते. व त्यांच्या साकल्याने विचार केल्यानंतर मगच पिअर्सने ज्याला पदधतीशास्त्र मीमांसा म्हटले आहे. तो तर्कशास्त्राचा विभाग तयार होतो.

यापैकी पहिल्या आणि तिस-या प्रकारच्या तर्कशास्त्राचा विशेष अभ्यास करुन त्याने आपली अर्थविषयक उपपत्ती उभारली आहे.

दुस-या समीक्षात्मक तर्कशास्त्रामध्ये तर्कशास्त्रातील समस्यांचा आणि प्रमुख तर्कशास्त्रीय शाखांचा ऊहापोह केला आहे. पिअर्सच्या मते तर्कशास्त्राचे तीन प्रमुख उपप्रकार पडतात. ***[1] निगमन [2] विगमन आणि [3] उपपादनात्मक तर्क*** निगमनामध्ये चिन्हात्मक तर्कशास्त्राने पारंपारिक तर्कशास्त्र यांचा अंतर्भाव होतो निगमनामध्ये सर्व वैज्ञानिक पदधतींचा व तंत्राचा व संशोधनसामग्री साधनांचा अंतर्भाव होतो. उपपादनात्मक तर्कशास्त्रामध्ये परिक्षणाचा व पडताळा पाहून सिद्धता करण्याच्या विविध चाचण्याचा आणि कसोट्याचा अंतर्भाव होतो. वैज्ञानिक स्पष्टीकरण देण्यासाठी त्यांची आवशयकता असते व त्यामुळे पिअर्सने त्यांना उपपादनात्मक तर्कशास्त्र या स्वतंत्र गटात समाविष्ट केले आहे.

## [इ] सत्याचे प्रकार :-

**पिअर्सने सत्याचे अनेक प्रकार मान्य केले आहे.**

1. **अतीत सत्य :-**

सर्व वस्तुच्या ठिकाणी विवक्षीत वस्तू म्हणून जे सत्य असते त्याला पिअर्सने अतीत सत्य असे म्हटले आहे. पूर्वी स्कोल्यास्टिकांनी जे सद्विषयक तत्व सांगितले होते त्याचा पिअर्सच्या मनावर पगडा होता. स्कोल्यास्टिकांचे असे प्रसिदध वचन आहे की प्रत्येक सत् हे एक सत्य आणि शिव असते. विज्ञानामध्ये अशा प्रकारच्या सत्याचा शोध करावयाचा असतो असे मान्य केले तर त्याचा अर्थ विज्ञानांत वस्तुच्या ख-याखु-या गुणधर्माचे संशोधन करावयाचे असते. असा होतो. मात्र माणसाला

*Shriniwas Hemade,hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



सर्वच्या सर्व गुणमर्ध ज्ञात होतील किंवा होणार नाहीत हे ध्यानात ठेवले पाहिजे. व विज्ञानक्षेत्रातील संशोधकाने ज्ञानाची मर्यादा लक्षात आल्यामुळे नम्र असले पाहिजे.

### 2. संकिर्ण सत्य :-

दुस-या प्रकारचे सत्य हे विधानाशी संबंधित सत्य असते व अशा वैज्ञानिक सत्यांना पिअर्सने संकिर्ण सत्य ही संज्ञा वापरली आहे. त्याच्या मते या गटामध्ये दोन उपप्रकार करता येतात. [अ] विधानांचे नैतिक सत्य [ब] विधानांचे तार्किक सत्य पहिल्या नैतिक सत्यामध्ये वक्ता अथवा लेखक यांच्या ठिकाणचे विश्‍वास व श्रद्धा यांच्याशी विधानांचा मेळ बसणे अथवा सामजंस्य राखले जाणे, हे महत्वाचे लक्षण असते. विधानाचे तार्किक सत्य त्या विधानात व्यक्त होणारा अर्थ प्रत्यक्ष अनुभवाशी मिळतोजुळतो किंवा नाही याच्यावर अवलंबून असतो. दुस-या शब्दात ज्या विधानांचे अनुभवाच्या द्वारा निषेधन होऊ शकते ते तार्किक दृष्ट्या असत्य असते. ज्या विधानाचे अनुभवांच्या द्वारा निषेधन करणे शक्य नसते ते तार्किक दृष्टया सत्य असते. प्रत्येक विधान सत्य तरी असते अथवा असत्य तरी असते. येथे द्विमूल्यात्मक तर्कशास्त्रातील विधांनात्मक संबंधीची व्याख्या पिअर्सला पूर्णपणे मान्य आहे हे स्पष्ट होते आता काही विधाने अशी असतात की त्यांचे अनुभवाद्वारा निषेधन करताच येत नाही. गणितामधील सिद्वांत व सूत्रे अशी सर्वदा सत्य विधाने असतात. त्यांचे निषेधन करता येईल, असे एकही विशिष्ट उदाहरण देणे शक्य नसते. अर्थात पिअर्सच्या मते विधाने सांकेतिक असतात आणि मूर्त वस्तूशी त्यांचा संबंध नसल्यामुळे त्यांचे प्रत्यक्ष व्यवहारात निषेधन करणे अशक्य असते. अर्थात पिअर्सच्या या दृष्टिकोनाविषयी मतभेद असले तरी काही विधाने सर्वदा सत्य असतात हे त्याचे म्हणणे स्वीकार्य आहे.

काही विधाने सत्यही नसतात किंवा असत्यही नसतात. विधानांमधील सिद्वांतकल्पना अशा प्रकारच्या अनिश्‍चत विधानांच्या गटांत पडतात. परिक्षणानंतर एखादी सिद्वांत कल्पना असत्य व त्याज्य ठरु शकते हे खरे आहे परंतु परिक्षण केल्यानंतरही एखादा सिद्वांत सत्य आहे असे निशिचत सांगता येत नाहीत. ती कामचलाऊ सिद्वांत कल्पना म्हणून स्वीकारुन पुढचे संशोधन चालू ठेवावे लागते.त्यामुळे वेज्ञानिक क्षेत्रातील सिद्वांत कल्पना संभाव्यतेच्या वेगवेगळया अंशात्मक पातळया दर्शवितात व त्यांच्या संभाव्यतेतही बदल होऊ शकतो.

थोडक्यात मानवाचे वैज्ञानिक व इतर क्षेत्रातील ज्ञान अनिश्‍चित व स्खलनशील असते. मनुष्य चुकण्याचा संभव असतो पिअर्सच्या स्खलनशीलतेविषयीच्या सिद्वांतामध्ये ही ज्ञानाची सापेक्षता अभिप्रेत आहे थोडक्यात अंतिम शाश्‍वत सत्य हे संशोधनाचे व अन्वेषणाचे अंतिम साध्य आहे परंतु माणसाला तेथे पोहोचणे कधीच शक्य होत नाही. मात्र त्याच्या शक्य तेवढे जवळ जाण्याचा प्रयत्न माणसाला करता येतो.

सत्याच्या व्याख्या अनेक दृष्टीकोनातून करता येतात. सदवस्तू मीमांसेच्या दृष्टीकोनातून वैशिवक सत्य हे सर्व सत्याचे उगमस्थान संदर्भ व निकष असते असे म्हणता येईल. येथे हेगेलच्या एकतत्ववादाचा पिअर्सच्या मनावरील पगडा दिसून येतो व पिअर्सने तो मोकळेपणाने मान्यही केला आहे. ज्ञानमीमांसेच्या दृष्टीकोनातून सत्याची वैज्ञानिक संदर्भातच केवळ व्याख्या करता येते व ज्यांचे निषेधन होऊ शकत नाही असे विधान सत्य व ज्यांचे निषेधन होऊ शकते ते असत्य असे ठरविता येते.

*********************************

प्रश्न 1] खालीलपैकी कोणत्याही चारांवर प्रत्येकी 100 शब्दांत टीपा लिहा. [20]

1. पीअर्सची शोध ही कल्पना.
2. पीअर्स यांनी केलेले फलवादाचे प्रकार.

प्रश्न 1] खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 200-250 शब्दात द्या. [30]

1. पीअर्सचा फलवाद विषयक दृष्टिकोन स्पष्ट करा आणि त्याची सविस्तर चर्चा करा.
2. पीअर्स यांचा अर्थसिध्दांत सांगा.
3. अर्थविषयक उपयुक्त सिध्दांताचे स्वरूप काय आहे ?